
# सोलापूर महानगरपालिका

## सोलापूर महानगरपालिका
## सन २०१६-२०१७ चे
## अंदाजपत्रक 'अ' व 'क'



**मा.श्री.वि.ना.काळम**

आयुक्त

सोलपूर महानगरपालिका,सोलापूर.

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

जा.क्र.न.आ./मुले-६/अंदाज २६५
मा. आयुक्त यांचे कार्यालय
सोलापूर दि.१५/०२/२०१६

मा. अध्यक्ष
स्थायी समिती,
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर.

**विषय - सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक " अ " व " क "**

सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त या पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर माझ्या कार्यकाळातील हे पहिले अंदाजपत्रक आहे. सन २०१५-१६ चे सुधारित व सन २०१६-१७ चे अंदाज पत्रक ''अ'' व ''क'' सादर करीत आहे.

सदर अंदाजपत्रक सादर करताना महानगरपालिकेची आर्थिक बाजू भक्कम नसल्याने आर्थिक स्वावलंबन कसे करता येईल त्यादृष्टीने, तसेच महानगरपालिकेच्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या देय रक्कमा कशा भागविता येतील याबाबत व शहरातील व हद्दवाढीसह असलेल्या नागरिकांना जास्तीत जास्त नागरी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात केलेला आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी अत्यंत मर्यादित स्वरुपाच्या असून, शहराची औद्योगिक वाढ गेल्या पाच सहा वर्षापासून ठप्प झालेली आहे. सोलापूर शहरातील कर दात्यांच्या क्रयशक्तीला मर्यादा पडलेल्या आहेत. त्यामुळे शहराचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने या अनुषंगिक बाबींच्या निर्मितीत वाढ होणे आवश्यक असते, त्या सर्व बाबींची वाढ सोलापूर शहराच्या बाबतीत गेल्या ८ ते १० वर्षापासून दृष्टोत्पतीस येत नाही. तरी परंतु उत्पन्न वाढ विण्याचा कसोशीने प्रयत्न करून एवढ्या प्रचंड खर्चाचा डोलारा सांभाळावा लागत असल्याने ही परिस्थिती व वस्तुस्थिती समोर ठेवूनच अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सन २०१५ - २०१६ चे अंदाजपत्रकांत खालीलप्रमाणे उत्पन्न अपेक्षित धरलेले होते.

## महसूल विभाग

| अ. क्र. | बाब | मान्य अंदाज |
|---|---|---|
| १ | महसूली उत्पन्न | र.रू.४७३,१८,९४,०००/- |
| २ | पाणी पुरवठा | र.रू .६०,४९,६९,०००/- |
| | एकूण | र.रू.५३३,६८,६३,०००/- |

## सुधारित अंदाज

| अ. क्र. | बाब | सुधारित अंदाज |
|---|---|---|
| १ | महसूली उत्पन्न | र.रू.३२२,१४,०९,०००/- |
| २ | पाणी पुरवठा | र.रू . ४३,४२,००,०००/- |
| | एकूण | र.रू.३६५,५६,०९,०००/- |

(तुटीची भरपाई रक्कम रु. ८७,०७,०००/- वगळून)

इष्टांकापेक्षा कमी /अधिक ज्या विभागाकडून आली त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे

| अ. क्र. | विवरण | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | कर आकारणी | ३४,९०,००,००० | |
| २ | ग.व.सू. वसुली | १,००,००,००० | |
| ३ | उद्यान | २४,९०,००० | |
| ४ | आयातकर/स्थानिक संस्था कर | ३९,९९,००,००० | |
| ५ | मंडई | १,३१,१०,००० | |
| ६ | सार्वजनिक आरोग्य अभियंता | १५,५०,००० | |
| ७ | नगर अभियंता | १२,५५,००,००० | |
| ८ | भूमी व मालमत्ता | २१,०८,००,००० | |
| ९ | सामान्य प्रशासन विभाग | - | ६,५०,०००/- |
| १० | हद्दवाढ | ४१,८०,००,००० | |
| ११ | आरोग्य खाते | १,११,२०,००० | |
| १२ | इतर बाबी | १४,०४,३४,००० | |
| | एकूण | १६८,१९,०४,००० | ६,५०,००० |

कमी - र.रु. १६८,१९,०४,०००/-

अधिक - र.रु. ६,५०,०००/-

**एकूण - र.रु. १६८,१२,५४,०००/-**

सन २०१५-२०१६ चे सुधारित अंदाजपत्रकामध्ये दिलेल्या उद्दीष्टाप्रमाणे महसूली उत्पन्न आले नाही त्याची कारणे पुढीलप्रमाणे

## स्थानिक संस्था कर

सन २०१५-१६ या आर्थिक सालाकरिता स्थानिक संस्था कर या शिर्षा खाली र.रू. २.०० कोटी उत्पन्न अपेक्षित धरणेत आले होते. सन २०१४ -१५ च्या प्रथम सहामाही मध्ये मिळालेले एकूण प्रत्यक्ष रू.५१,८५,३७,०९३/-इतके मिळालेले आहे व चालु आर्थिक वर्ष सन २०१५-१६ च्या प्रथम सहामाहीमध्ये र.रू. ५५,५०,२६,५३९/- इतके प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे.

सन २०१५-२०१६ मधील प्रथम सहामाहीचे उत्पन्न गतवर्षाचे प्रथम सहामाही उत्पन्नापेक्षा र.रु. ३,६४,८९,४४६/- ने जास्त आहे.

मा. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.जा.क्र. स्थासंक २०१५/प्र.क्र.८२/२०१५/नवि-३२ दि. ३ जून २०१५ अन्वये "स्थानिक संस्था कर अभय योजना -२०१५" जाहिर करून या योजनेचा कालावधी दि. ३ जून २०१५ ते दि. ३१ जुलै २०१५ अशी निश्चित करणेत आलेली होती. या मध्ये वाढ करून ती दि. ३१ ऑगस्ट २०१५ अखेर करणेत आली. या योजनेमध्ये ज्या व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कराची थकबाकीसह संपूर्ण रक्कम व विवरणपत्र मूदतीत सादर केल्यास त्यावरील व्याज व दंड माफ करणे बाबत मा. शासनाचे आदेश होते. या कालावधीत एकूण ५१९१ व्यापाऱ्यांनी अभय योजनेचा लाभ घेतलेला असून र.रू. ७,३५,००,५७२/-इतकी जमा झालेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग कडील अधिसूचना क्र.स्थासंक-२०१५/प्र.क्र.४७/२०१५/नवि-३२दि १/८/२०१५ दि. १/८/२०१५ अन्वये ज्या व्यापाऱ्यांचे खरेदी किंवा विक्रीची उलाढाल र.रू. ५०.०० कोटी पेक्षा कमी आहे अशा व्यापाऱ्यांना दि. १/८/२०१५ पासून स्थानिक संस्था करापासून सुट देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.स्थासंक -२०१५/प्र.क्र.१८१/नवि-३२ दि. १/१०/२०१५ अन्वये पेट्रोल व डिझेलवरील स्थानिक कर दि. १/१०/२०१५ पासून माफ करणेत आलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णयामुळे माहे ऑगस्ट-२०१५ पासून र.रू. ५०.०० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकडून येणारी स्थानिक संस्था कराची रक्कम खंडित झालेली आहे. त्यामुळे द्वितीय सहामाही मध्ये म्हणजेच ऑक्टोबर - २०१५ ते डिसेंबर २०१५ अखेर र.रू. ४,८२,७९,२६३/- इतकी रक्कम जमा झालेली आहे.

शासनाने दि. १ ऑगस्ट.२०१५ पासून र.रू. ५०,०० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर मधून सूट दिल्याने महानगरपालिकांच्या स्थानिक संस्था कर पासून उत्पन्नामध्ये येणारी घट भरून काढण्यासाठी मा. शासनाकडून माहे ऑगस्ट-२०११५ पासून र.रू. १२.३७ कोटी सहाय्यक अनुदान म्हणून देण्यात आलेली आहे व माहे जानेवारी २०१६ पासून या अनुदानात वाढ करून र. रू. १३.०३ कोटी करणेत आलेली आहे.

सबब चालु अर्थिक वर्षात प्रथम सहामाही मध्ये प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न व माहे डिसेंबर २०१५ अखेर प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न रक्कम रू. ६०,३३,०५,८०२/- इतके मिळालेले आहे. शासन निर्णयानुसार पेट्रोल, डिझेल व ऑईल कंपन्या वगळता र.रू. ५०.०० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेले ४ व्यापारी आहेत त्यांचेकडून दरमहा सुमारे र.रू. १.५० कोटी इतकी स्थानिक संस्था कराची रक्कम भरली जाते. शासनाने जहिर केलेल्या अभय योजना मध्ये ज्या व्यापाऱ्यांनी अभय योजनेचा लाभ घेतला आहे. अशा व्यापाऱ्यांचे मुल्यनिर्धारणाची कार्यवाही माहे मार्च २०१६ अखेर पूर्ण करणेची असून ,त्याप्रमाणे

असेसमेंटचे काम हाती घेण्यात आलेले आहे. तथापि असेसमेंटची संख्या व शासनाने दिलेला कालावधी विचारात घेता असेसमेंटचे काम अधिक जलद गतीने होणे आवश्यक असल्याने मा. सर्वसाधारण सभेने सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकीय सभेमध्ये दिलेल्या सुचनेनुसार खाजगी सी.ए. फर्मची नियुक्तीची कार्यवाही हाती आहे. अभय योजनेतील पात्र व्यापाऱ्यांचे व्याज व दंड माफ करणेचा आहे. याबाबी विचारात घेता माहे मार्च २०१६ अखेर अपेक्षित उत्पन्न विचारात घेऊन मार्च -२०१६ अखेर र.रू. ७५ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

## स्थानिक संस्था करापोटी शासन अनुदान

सन २०१५-२०१६ करिता या शिर्षाखाली र.रू. २०.०० कोटींचे अनुदान अपेक्षित धरणेत आलेले होते. सन २०१५-१६ मध्ये माहे डिसेंबर २०१५ अखेर १ % मुद्रांक शुल्कापोटी र.रू. ७,०५,७५,७१०/- इतके प्राप्त झालेले आहेत. याशिवाय शासनाने ज्या व्यापाऱ्यांची खरेदी किंवा विक्रीची उलाढाल र.रू. ५० कोटी पेक्षा जास्त नाही, अशा व्यापाऱ्यांना दि. १ ऑगस्ट २०१५ पासून स्थानिक संस्था करापासून सुट देण्यात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकांच्या स्थानिक संस्था करापासूनच्या उत्पन्नामध्ये येणारी घट भरून काढण्यासाठी मा. शासनाकडून माहे ऑगस्ट २०१५ ते डिसेंबर २०१५ दरमहा र.रू. १२.३७ कोटी प्रमाणे र.रू. ६१.८६ कोटी सहाय्यक अनुदानाची रक्कम प्राप्त झालेली आहे.या शिवाय माहे. जानेवारी २०१६ पासून दर महाचे सहाय्यक अनुदानाच्या रक्कमेत वाढ करून र.रू. १३.०३ कोटी मंजूर करणेत आलेले आहे. यास्तव माहे मार्च २०१६ अखेर या सदरी र.रू. ११० कोटी उतपन्न अपेक्षित आहे.

## कर आकारणी व कर संकलन

सन २०१५-२०१६ चे उद्दिष्ट देताना मागील थकबाकीच्या ७०% व चालू जमा बंदी पोटी ८०% वसूली अपेक्षित धरण्यात आलेली होती. याशिवाय कर आकारणी खात्याकडील काही मिळकतीही झोपडपट्टी विभागात येतात. त्यांच्याही नोंदी या विभागात येत असल्याने जमाबंदीमध्ये बदल करावा लागणार आहे. एकूण जमाबंदी पैकी काही रक्कम पाण्याची असुन, शहरातील मोठमोठ्या गिरण्या तसेच लक्ष्मी-विष्णू, जाम मिल, नरसिंग गिरजी मिल, विव्हको प्रोसेस वगैरे बंद झाल्याने त्याचाही उत्पन्नावर परिणाम झालेला आहे. शहरातील ज्या मिळकतदाराकडे थकबाकी आहे, अशा मिळकती जप्त करुन थकबाकी वसुलीची कार्यवाही सुरु केलेली आहे. याशिवाय थकबाकी धारकांचे नळ बंद करणे, जंगम मालमत्ता जप्त करणे वगैरे कारवाई सुरु केलेली आहे.

शहरातील ज्या मिळकतदाराकडे थकबाकी आहे अशा थकबाकी धारकाकडून थकबाकी वसुलीसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणेत येत असून त्या सर्व बाबींचा विचार करुनही वर्ष अखेरीस र.रु.८३.५१ कोटी एवढेच उत्पन्न अपेक्षित आहे.

## हद्दवाढ विभाग

हद्दवाढ विभागामध्ये ज्या मिळकती आहेत त्यातील बऱ्याच ठिकाणी पूर्वी लोक रहात नव्हते. परंतू यामध्ये हळूहळू सुधारणा होत असून, महानगरपालिकेस मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार करुन हद्दवाढ भागामध्ये म्हणावे तेवढे रस्ते, ड्रेनेज, गटारी, दिवाबत्ती, पाणीपुरवठा वगैरे बाबतीत अद्यापी पुरेशा सुधारणा होत नसल्याने तसेच एम.आय.डी.सी. भागातील कारखाने ८०% बंद असल्याने व पाण्याची पाईपलाईन सर्व हद्दवाढ भागात नसल्याने मिळकत दारांचा खाजगी नळ घेणे बाबतचा कल दिसून येत नाही. पाण्याची पाईपलाईन हद्दवाढ भागात सुरळीत झाल्यास

मिळकतदारखाजगी नळ घेतल्यास सार्वजनिक पाणी पट्टी कमी होऊन खाजगी नळ आकारणी उत्पन्नात वाढ होईल व चालू आर्थिक वर्षात अपेक्षित उत्पन्न र.रु.४४.५०/– कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

## नगर अभियंता

या खात्याकडून जे उत्पन्न अपेक्षित आहे त्यामध्ये हद्दवाढ भागातील बांधकाम परवाना फी, बांधकाम परवाना विकास शुल्क व हद्दवाढ भागातील डेव्हलपमेंट चार्जेस इ. चा समावेश होतो. हद्दवाढ भागातील जी बांधकामे नियमित करुन घ्यावयाची आहेत. त्यातील काही भागांचा ले आऊट मंजूर नसल्याने अपेक्षित उत्पन्न आलेले नाही. हद्दवाढ भागाची मोजणी (Land Survey and Measurement) न झाल्याने एकूण प्रॉपर्टीज मोजमापात येऊ शकल्या नाहीत. त्याच बरोबर गुंठेवारी ने मिळणारी रक्कम उपलब्ध होऊ शकली नाही.

## गलिच्छ वस्ती विभाग

गलिच्छ वस्ती विभागासाठी सन २०१५–१६ करिता उद्दिष्ट देण्यात आले होते त्याप्रमाणे वसुल होईल असे वाटत नाही. कारण गलिच्छ वस्ती विभागाकडे प्रामुख्याने झोपडपट्टीचा समावेश होत असल्याने जास्तीत जास्त झोपडपट्टी सेवा आकाराच्या दराने वसुली सुरु आहे. तसेच काही मिळकतीवर दुहेरी आकारणीही झालेली आहे. गलिच्छ वस्तीमधील नागरिक दुर्बल घटकातील असल्याने वसुलीसाठी सक्तीचा व कडक उपाययोजना करणे अडचणीचे होत आहे. झोपडपट्टी धारकांना नवीन ओळखपत्र देण्याची कार्यवाही सुरु करणेत आली असून प्रत्येक झोपडपट्टीधारकांचे पूर्वीची थकबाकी भरल्याशिवाय नवीन ओळखपत्रे देण्यात येऊ नये अशी सक्त सुचना देण्यात आल्याने मार्च २०१६ अखेर रक्कम रु.४.०० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले आहे.

## भुमी व मालमत्ता

या विभागाच्या अधिपत्याखाली महानगरपालिकेने बांधलेली सर्व व्यापारी संकुले व मिनी गाळे येतात. याशिवाय अनाधिकृत खोक्यांचे भाडेवसुली याच विभागाकडून केली जाते. सन २०१५-१६ मध्ये जे उद्दिष्ट देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे थकबाकीदारांच्या बाबतीत नोटीसा काढून गाळे जप्ती सारख्या प्रकाराचा अवलंब करुन थकबाकी वसुलीची धडक मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. जे गाळे रिकामे आहेत. त्याला विशेष मागणी नसली तरी जाहीर प्रसिध्दीकरणाच्या आधारे सर्वच गाळे भाडेपट्टी कराराने दिले जातील. यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. महानगरपालिकेचे शॉपिंग सेंटरमधील ट्रान्सफरसाठी आलेले अर्ज,परस्पर झालेले व्यवहार व गेल्या १० ते १५ वर्षात भाडेवाढ न केल्यामुळे ॲक्युपंशी प्राईस मध्ये वाढ करणेत व भाडेवाढ करणेबाबत अशा सर्व बाबीं बाबत शहरात मोर्चा रूपाने आंदोलन झाले होते. हा संपूर्ण विषय गेल्या १० ते १५ वर्षात निर्णय न झाल्यामुळे व योग्य ती भाडेवाढ, ट्रान्सफर ॲक्युपंशी प्राईस या सर्व बाबींची विचार न केल्यामुळे महानगपालिकेचे नुकसान झालेले आहे.

याबाबत सातत्याने पाठपुरावा करुनही मार्च २०१६ अखेर रक्कम रु. ५.४७ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे सन २०१५-२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रकात सादर केले आहे.

## सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक

| जमा रक्कम रूपये | तपशील | खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|
| | महसूल विभाग | |
| २,५७,४०१ | आरंभीची शिल्लक | |
| ४३१,८८,९६,००० | महसूली विभाग | ३४४,८०,४३,००० |
| ६९,१५,०५,००० | पाणीपुरवठा | ६९,१५,०५,००० |
| | महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग | ८७,०८,५३,००० |
| | अखेरची शिल्लक | २,५७,४०१ |
| **५०१,०६,५८,४०१** | **एकूण** | **५०१,०६,५८,४०१** |

| | | |
|---|---|---|
| | **भांडवली विभाग** | |
| १०४,६८,५३,००० | महसुली निधीतून भांडवली कामे | १०४,६८,५३,००० |
| १५३,१०,००,००० | अनुदानातून करावयाची कामे | १५३,१०,००,००० |
| ४०,००,००,००० | कर्ज विभाग | ४०,००,००,००० |
| १५,००,००,००० | विशेष अनुदान | १५,००,००,००० |
| १५,००,००,००० | विकास कामाचे अनुदान | १५,००,००,००० |
| **३२७,७८,५३,०००** | **एकूण** | **३२७,७८,५३,०००** |
| **८२८,८५,११,४०१** | **एकूण** | **८२८,८५,११,४०१** |

## महसूल निधीतील जमा

महानगरपालिका ज्या वेगवेगळ्या बाबीवर खर्च करते तो खर्च महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातून भागविला जातो. उत्पन्नाच्या प्रमुख बाबी म्हणजे स्थानिक संस्था कर/आयातकर, करआकारणी, भूमी व मालमत्ता, नगरअभियंता व सार्वजनिक आरोग्य अभियंता इत्यादि आहेत. उत्पन्नाच्या मानाने वेगवेगळ्या बाबीवर होणारे खर्चाचे प्रमाण वाढलेले आहे , काटकसरीचे धोरण अवलंबावे लागणार आहे.

म.न.पा.च्या कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळ्या देय रक्कमा, प्रत्येक वस्तुच्या किंमतीमध्ये झालेली वाढ, विजेची बिले, छपाई, स्टेशनरी, रासायनिक पदार्थ तसेच सुटे भाग या मधील खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

## स्थानिक संस्था कर

सन २०१५-१६ सालाकरिता स्थानिक संस्था करापासून र.रू. २.०० कोटी उत्पन्न अपेक्षित धरणेत आले होते. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.जा.क्र.स्थासंक २०१५/प्र.क्र.८२/२०१५/नवि ३२ दि. ३ जून २०१५ अन्वये स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ जाहिर करून या योजनेचा कालावधी दि. ३ जून २०१५ ते दि. ३१ जुलै २०१५ अशी निश्चित करणेत आलेली होती. यामध्ये वाढ करून ती दि. ३१ ऑगस्ट २०१५ अखेर करणेत आली. या योजने मध्ये ज्या व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कराची थकबाकीसह संपूर्ण रक्कम व विवरणपत्र मुदतीत सादर केल्यास त्यावरील व्याज व दंड माफ करणेबाबत मा. शासनाचे आदेश होते. या कालावदीत एकूण ५१९१ व्यापाऱ्यांनी अभय योजनेचा लाभ घेतलेला असून ,रू.रू. ७,३५,००,५७२/-इतकी जमा झालेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र.स्थासंक२०१५/प्र.क्र४७/२०१५ नवि- ३२ दि.१/८/२०१५ अन्वये ज्या व्यापाऱ्यांचे खरेदी किंवा विक्रीची उलाढाल र.रू. ५०.०० कोटीपेक्षा कमी आहे. अशा व्यापाऱ्यांना दि. १/८/२०१५ पासून स्थानिक संस्था करापासून सुट देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.स्थासंक/२०१५/प्र.क्र.१८१/२०१५ नवि-३२ दि. १/१०/२०१५ अन्वये पेट्रोल व डिझेलवरील स्थानिक कर दि. १/१०/२०१५ पासून माफ करणेत आलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णयामुळे माहे ऑगस्ट-२०१५ पासून र.रू. ५०.०० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकडून येणारी स्थानिक संस्था कराची रक्कम खंडित झालेली आहे व शासनाने दि. १/१०/२०१५ पासून पेट्रोल , डिझेल व ऑईल यावरील स्थानिक संस्था कर माफ झाल्याने यापासून उत्पन्न अपेक्षित नाही. तथापि र.रू. ५०.०० कोटी पेक्षा जास्त खरेदी किंवा विक्रीची उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर लागू असल्याने व या मर्यादे अंतर्गत सोलापूरशहर हद्दीत असलेल्या व्यावसायिकाकडून दर महा अपेक्षित असलेली रक्कम विचारात घ्यावी लागेल . या शिवाय शासनाने जाहिर केलेल्या स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ चा लाभ न घेतलेल्या व्यापाऱ्यांचे निर्धारणाची कार्यवाही करावी लागणार असल्याने या सदरी उत्पन्न विचारात घेऊन र.रू. २५ कोटींची तरतूद सुचविणेत आलेली आहे. तथापि सदरचे उत्पन्न शासनाचे धोरणावर अवलंबून राहिल. .

**<u>स्थानिक संस्था करापोटी शासन अनुदान :</u>**

सन २०१५-१६ करिता या शिर्षाखाली र. रु.२०कोटी उत्पन्न अपेक्षित धरणेत आले होते. मा. शासनाने दि. १ ऑगस्ट,२०१५ पासून र.रु.५.०० कोटी पेक्षा उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करामधून सुट दिल्याने महानगरपालिकांच्या स्थानिक संस्था करापासूनच्या उत्पन्नामध्ये येणारी घट भरून काढण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये मंजूर करण्यात आलेली सहाय्यक अनुदानाची रक्कम व १ % मुद्रांक शुल्कापोटी अपेक्षित अनुदानाची रक्कम विचारत गेऊन सन २०१६-१७ करिता या सदरी र.रू. १६५.०० कोटी ची तरतूद सुचविणेत आलेली आहे. तथापि सदरचे उत्पन्न हे शासनाचे धोरणावर अवलंबून राहिल.

**<u>नगरअभियंता :</u>**

शहरामध्ये अनाधिकृत बांधकामाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने महानगरपालिकेच्या भौगोलिक माहितीा यंत्रणा (GIS) द्वारे दिसून येते. जवळपास एक लाख बांधकामे अनाधिकृत आहेत. ही सर्व बांधकामे नियमित करणे,त्यासाठी शासनाची अद्यावत

उपरोक्त शासन निर्णयामुळे माहे ऑगस्ट–२०१५ पासून र.रू. ५०.०० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकडून येणारी स्थानिक संस्था कराची रक्कम खंडित झालेली आहे व शासनाने दि. १/१०/२०१५ पासून पेट्रोल , डिझेल व ऑईल यावरील स्थानिक संस्था कर माफ झाल्याने यापासून उत्पन्न अपेक्षित नाही. तथापि र.रू. ५०.०० कोटी पेक्षा जास्त खरेदी किंवा विक्रीची उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर लागू असल्याने व या मर्यादे अंतर्गत सोलापूरशहर हद्दीत असलेल्या व्यावसायिकाकडून दर महा अपेक्षित असलेली रक्कम विचारात घ्यावी लागेल . या शिवाय शासनाने जाहिर केलेल्या स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ चा लाभ न घेतलेल्या व्यापाऱ्यांचे निर्धारणाची कार्यवाही करावी लागणार असल्याने या सदरी उत्पन्न विचारात घेऊन र.रू. २५ कोटींची तरतूद सुचविणेत आलेली आहे. तथापि सदरचे उत्पन्न शासनाचे धोरणावर अवलंबून राहिल. .

## <u>स्थानिक संस्था करापोटी शासन अनुदान :</u>

सन २०१५–१६ करिता या शिर्षाखाली र. रु.२०कोटी उत्पन्न अपेक्षित धरणेत आले होते. मा. शासनाने दि. १ ऑगस्ट,२०१५ पासून र.रु.५.०० कोटी पेक्षा उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करामधून सुट दिल्याने महानगरपालिकांच्या स्थानिक संस्था करापासूनच्या उत्पन्नामध्ये येणारी घट भरून काढण्यासाठी सन २०१५–१६ मध्ये मंजूर करण्यात आलेली सहाय्यक अनुदानाची रक्कम व १ % मुद्रांक शुल्कापोटी अपेक्षित अनुदानाची रक्कम विचारत गेऊन सन २०१६–१७ करिता या सदरी र.रू. १६५.०० कोटी ची तरतूद सुचविणेत आलेली आहे. तथापि सदरचे उत्पन्न हे शासनाचे धोरणावर अवलंबून राहिल.

## <u>नगरअभियंता :</u>

शहरामध्ये अनाधिकृत बांधकामाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने महानगरपालिकेच्या भौगोलिक माहितीी यंत्रणा (GIS) द्वारे दिसून येते. जवळपास एक लाख बांधकामे अनाधिकृत आहेत. ही सर्व बांधकामे नियमित करणे,त्यासाठी शासनाची अद्यावत

नियमावली येणे जरूरीचे आहे. त्या नियमावलीचा उपयोग करून जी बांधकामे कायदेशीर होतील ती कायदेशीर करणे व गेल्या १० वर्षाचा महसूल बांधकाम विकास शुल्क बांधकाम धारकांकडून वसूल करावा यासाठी दंडात्मक कारवाई करून कायदेशीर करणे क्रमप्राप्त आहे. तदनंतरच महापलिकेच्या उत्पन्न वाढी मध्ये भर होणार आहे.

## कर आकारणी व कर संकलन :

मागील ३ वर्षाचा उत्पन्नाचा व नैसर्गिक बाबीचा विचार करुन थकबाकीचा ७०% व जमाबंदीचा ९०% उत्पन्न धरुन पुढील वर्षासाठी कर आकारणी व कर संकलन खात्याकडून रक्कम रु.१३६.८६ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

शहरामध्ये असलेल्या मिळकतीचे आकारणीचे बिले, ग.व.सु. विभागाकडून तसेच कर आकारणी खात्याकडून या दोन्ही विभागाकडून एकाच मिळकतीचे दोन वेळा आकारणी होत असल्याने अशा न प्राप्त होणाऱ्या रक्कमा डिमांडमध्ये दर्शविल्या जात आहेत.

खुल्या जागेवर किंवा जुनी इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन इमारती झाल्या आहेत. अश्याबाबतीत जुन्या इमारतीवरील आकारण्या कमी न होता त्या मिळकतीवरच नवीन बांधकामाच्या आकारण्या होऊन या दोन्ही आकारण्या डिमांडमध्ये आहेत.

भाडेकरी अगर बिल्डरनी घेतलेले नळ, भाडेकरी अगर बिल्डर हे नळ बंद करुन न घेता ते जागा सोडून जातात. त्यामुळे अशा रक्कमा डिमांडमध्ये तशाच वर्षानुवर्षे पुढे ओढल्याने वर्षानुवर्षे डिमांड वाढत चाललेले आहे.

तसेच भौगोलिक माहिती यंत्रणा (GIS) सिस्टीम द्वारे सर्व मालमत्ता धारकांची सर्व्हे बाबतीत निविदा काढणेची कार्यवाही चालु आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाले नंतर ज्या मालमता धारकांना आकारणी करणेत आलेली नाही किंवा ज्यांनी अतिरिक्त बांधकाम केलेला आहे. अशा सर्व मालमत्ता धारकांकडून दंडासह वसूल करणेची कार्यवाही हाती आहे. तसेच जनरल रिव्हीजन गेल्या १० ते १२ वर्षापासून झालेले नसल्याने ,

मा. म.न. पा. सभेकडून कराचे दर निश्चित होऊन मिळाल्यास रिव्हीजन द्वारे उत्पन्नात वाढ होणार आहे.

## भूमी व मालमत्ता कार्यालय :

सोलापूर शहरातील महानगरपालिकेच्या मालकीची निरनिराळे भूखंड, इमारती व जागा निरनिराळ्या व्यक्ती व संस्थांना भुईभाड्याने अथवा भाड्याने देण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) नुसार चालू बाजार भावाने भाड्याने अथवा विक्री करणे कायद्याने बंधनकारक असल्याने या पूर्वी अश्या ज्या जागा अथवा इमारती नाममात्र दराने भाड्याने दिलेले आहेत. अश्या जागांचे पुर्ननिरीक्षण करुन सध्याचे होणारे बाजार भावाने त्यांचेकडून भाडे वसूल करण्याची कार्यवाही करणेकामी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आलेले आहे.त्यास अद्याप मंजूरी मिळालेली नाही . त्यास मंजूरी मिळ्ल्यास भूमी व मालमत्ता विभागाकडून जास्तीचे उत्पन्न अपेक्षित आहे.

## महसुली खर्च :

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक तयार करताना दुरुस्ती देखभालीच्या खर्चा बरोबरच सेवकांच्या वेतनावर सध्या दाखविणेत आलेल्या खर्चा व्यतिरिक्त सेवकांच्या देय रक्कमाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. म.न.पा. सेवक, सेवानिवृत्त सेवकांचे पेन्शन, प्राथमिक व दुय्यम शिक्षण सेवकांचे खर्च व पाणीपुरवठा सेवकवर्ग खर्च याचा विचार करता एकूण अपेक्षित उत्पन्नाच्या ४४.८०% इतका आस्थापना खर्च होणार आहे.

**मा. महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार महिला व बालकल्याण समितीसाठी व आंबेडकर आवास योजना (श्रमसाफल्य) एकूण महसूलीमधील शिल्लक रकमेतून ५% इतकी रक्कम तसेच अपंगासाठी**